# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 28/10/2023 (शनिवार) सकाळ

---

**नैसर्गीक आपत्तीमुळे शासनाकडून नुकसान भरपाई देण्याचे आमीष देवून शेतकऱ्यांच्या ११३,४६,९९,००३/—रूपयाचा अपहार करून फसवणुक करणारे मुख्य दोन आरोपी गजाआड**

**स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीणची कारवाई**

पोलीस स्टेशन मौदा जिल्हा नागपुर ग्रामीण नागपुर येथे नागपुर जिल्हयातील पिडीत १५२ शेतकरी यांना नैसर्गीक आपत्तीमुळे शासनाकडून नुकसान भरपाई देण्याचे आमीष देवून त्यांचेकडुन विश्वासाने संबंधीत कागदपत्र घेवुन शेवकरी यांचे नावे लाखो रूपयाचे बोगस अर्ज प्रकरणे तयार करून ते बँक रेकॉर्डवर खरे असल्याचे दाखवून ११३, ४६, ९९,००३ /—रूपयाचा अपहार करून फसवणुक केल्याचे फिर्यादीचे रीपोर्ट वरून पोलीस स्टेशन मौदा येथे गुन्हे रजि नं. ७८३/२०२३ कलम ४०६, ४०९, ४१३, ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, १२० (ब) भादंवि सहकलम ३ एम. पी. आय. डी. सहकलम ६६(बी) आय.टी. ॲक्ट नुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवुन नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से) यांनी सदर गुन्हयातील मुख्य आरोपी **रमन्नाराव मुसल्या बोल्ला व विरव्यंकटराव सत्यनारायण वाकलपुडी** यांचा शोध घेवुन अटक करण्याबाबत स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण येथील विशेष पथक तयार केले. वरिष्ठांनी दिलेल्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पथक दोन्ही आरोपींचा शोध सुरु करून तांत्रिक पद्धत तसेच गोपनिय बातमीदार यांच्याकडुन खात्रीशिर माहिती मिळाली की, आरोपी हे कर्नाटक राज्यातील बॅंगलोर व आंध्रप्रदेश राज्यातील विजयवाडा येथे असल्याची माहिती मिळाली. सदर माहितीवरून वरीष्ठांच्या परवानगीने सुरूवातीला बॅंगलोर येथे शोध घेवुन तेथे मिळुन न आल्याने त्यानंतर विजयवाडा आंध्रप्रदेश येथे जावुन शोध घेतला असता दोन्ही आरोपी विजयवाडा येथे एका हॉटेल मध्ये मिळुन आले. स्थानिक पोलीसांच्या मदतीने दोन्ही आरोपी नामे— **१) रमन्नाराव मुसल्या बोल्ला वय ४८ वर्ष रा. प्लॉट नं. ५९४/२५० भारत नगर, कळमना, नागपूर आणि २) विरव्यंकटराव सत्यनारायण वाकलपुडी वय ४३ वर्ष रा. डुंबरी स्टेशन, चंपा आश्रम, पोस्ट खंडाळा तह. पारशिवनी जि. नागपूर** यांना कायदेशिररित्या ताब्यात घेतले.

वरील दोन्ही आरोपीतांना पुढील कायदेशीर प्रक्रियेकरीता आर्थिक गुन्हे शाखे अंतर्गत विशेष तपास पथकाकडे दोन्ही आरोपीतांना ताब्यात देण्यात आले.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक नागपूर (ग्रामीण) श्री. हर्ष पोद्दार (भा.पो.से.) तसेच अप्पर पोलीस अधीक्षक डॉ. श्री. संदीप पखाले साहेब यांचे मार्गदर्शनात, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे, सहायक पोलीस निरीक्षक राजीव कर्मलवार, पोलीस उपनिरीक्षक बट्टूलाल पांडे, पोलीस हवालदार विनोद काळे, इक्बाल शेख, दिनेश आधापुरे, पोलीस नायक रोहन डाखोरे, सतीश राठोड यांनी पार पाडली.

सदर गुन्हयाचा तपास विशेष पथकाचे प्रमुख उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक विभाग श्री. आशित कांबळे (भा.पो.से.), उपविभागीय पोलीस अधिकारी नागपूर विभाग श्रीमती पूजा गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली आर्थिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण येथील पोलीस निरीक्षक किशोर नगराळे, सहायक फौजदार शांताराम मुदमाळी, पोलीस हवालदार प्रविण सिडाम, अजिज शेख, सचिन खरबडे, ललीत उईके, महिला पोलीस हवालदार स्वाती लोखंडे, विशाखा मुंडे, पोलीस नायक गजेंद्र निंबेकर, पोलीस अंमलदार वृशभ उईके, निलेश बरडे हे करीत आहे. सदर दोन्ही आरोपीतांना आज रोजी मा. न्यायालयात हजर करून १४ दिवसाचा पोलीस कस्टडी रिमांड घेण्यात आला.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर